2024

H19

**B** → संच क्रमांक

# प्रश्नपुस्तिका
# सामान्य क्षमता चाचणी

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.
421718

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

### ताकीद

**ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपत्रिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) अधिनियम २०२४" मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

1. २६ जुलै १८७६ रोजी, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी स्थापन केलेल्या इंडियन असोशिएशनचे पहिले सचिव कोण होते ?
(1) प्रा. सुंदर रामन
(2) डब्ल्यू. एस. ब्लंट
(3) आनंद मोहन बोस
(4) शिशिर कुमार घोष

Who was the first secretary of the Indian Association established by Surendranath Banarjee on 26th July 1876 ?
(1) Prof. Sundar Raman
(2) W. S. Blunt
(3) Anand Mohan Bose
(4) Shishir Kumar Ghosh

---

2. खालीलपैकी नागपूरच्या कोणत्या राजाने आपल्या मृत्यूनंतरच्या वारसाची काहीच व्यवस्था न केल्याने कंपनी सरकारने त्यांचे राज्य खालसा केले होते ?
(1) राजा रघुजी दुसरा
(2) राजा रघुजी तिसरा
(3) श्रीमंत मालोजी राजे भोसले
(4) श्रीमंत आप्पासाहेब राजे भोसले

The State was lapsed by company government for not making proper arrangement of his descendants after his death by which of the following kings of Nagpur ?
(1) Raja Raghuji II
(2) Raja Raghuji III
(3) Shreemant Maloji Raje Bhosle
(4) Shreemant Appasaheb Raje Bhosle

---

3. खालीलपैकी योग्य विधानाच्या पर्यायाची निवड करा.
a. भारतात पहिली सुती कापडाची गिरणी मुंबई येथे सुरू झाली.
b. भारतात पहिली तागाची गिरणी रिश्रा येथे सुरू झाली.
c. भारतातील पहिली सुती कापड गिरणी कावसजी नानाभाई यांनी सुरू केली.
(1) फक्त a आणि c
(2) फक्त a आणि b
(3) फक्त b आणि c
(4) a, b आणि c

Choose the option of correct statements from the following.
a. The first cotton mill in India was started in Mumbai.
b. The first linen mill in India was started in Rishra.
c. India's first cotton mill was started by Kawasji Nanabhai.
(1) Only a and c
(2) Only a and b
(3) Only b and c
(4) a, b and c

4. कोल्हापूर येथील २७ व्या पलटणीतील हिंदी शिपायांनी खालीलपैकी कोणाच्या नेतृत्वाखाली ३१ जुलै १८५७ चे बंड केले होते ?
   अ. रामजी शिरसाठ
   ब. नानासाहेब पेशवे
   क. रंगो बापूजी
   ड. भिमा नाईक
   (1) फक्त अ आणि ब (2) फक्त ब आणि क (3) फक्त ब, क आणि ड (4) फक्त अ

   Who led the 31 July 1857 Revolt of 27th Regiment of Indian Soldier's at Kolhapur ?
   a. Ramaji Shirsat
   b. Nanasaheb Peshwa
   c. Rango Bapuji
   d. Bhima Naik
   (1) Only a and b (2) Only b and c (3) Only b, c and d (4) Only a

5. 'झांशीची राणी म्हणजे सर्व बंडखोरांमधील एकमेव पुरुष होती', हे विधान खालीलपैकी कोणी केले ?
   (1) जॉन लॉरेन्स (2) मेजर सार्जंट
   (3) ह्यू रोज (4) कॉलीन कॅम्पबेल

   Who among the following made the statement 'The queen of Jhansi was the only male among all the rebels' ?
   (1) John Lawrence (2) Major Sergeant
   (3) Hugh Rose (4) Colin Campbell

6. २७ जुलै १८८९ रोजी लंडन येथे राष्ट्रीय काँग्रेसच्या 'ब्रिटीश इंडिया कमिटी' च्या स्थापने मध्ये खालीलपैकी कोणत्या व्यक्ती संबंधित होत्या ?
   अ. फिलिप स्प्रॅट, ब्रॅन ब्रॅडले
   ब. सर ॲलन ह्यूम, डिग्बी
   क. दादाभाई नौरोजी, व्योमेशचंद्र बॅनर्जी
   ड. वेडरबर्न, डब्ल्यू. एस. केन
   (1) फक्त अ आणि ब (2) फक्त ब आणि क
   (3) फक्त अ, ब आणि क (4) फक्त ब, क आणि ड

   Which of the following personalities were related with establishment of 'British India Committee' for National Congress at London on 27 July 1889 ?
   a. Philip Spratt, Brian Bradley
   b. Sir Allan Hume, Digby
   c. Dadabhai Naoroji, Womesh Chandra Banerjee
   d. Wedderburn, W. S. Kane
   (1) Only a and b (2) Only b and c
   (3) Only a, b and c (4) Only b, c and d

7. १९०९ मध्ये 'कामगार हितवर्धक सभा' या संघटनेची स्थापना करून कामगारांना शिक्षण, कायदेशीर सल्ला देण्याचे काम खालीलपैकी कोणत्या व्यक्तींनी केले होते ?

अ. भिवाजी नरे

ब. सीताराम बोले

क. हरीहर सोनुले

ड. बॅ. हरिश्चंद्र तालचेरकर

(1) फक्त अ आणि ब
(2) फक्त ब आणि क
(3) फक्त अ, ब आणि ड
(4) फक्त अ, क आणि ड

Which of the following personalities provided education, legal advice to labours by the establishment of organization 'Kamgar Hitvardhak Sabha' in 1909 ?

a. Bhivaji Nare

b. Sitaram Bole

c. Harihar Sonule

d. Barr. Harishchandra Talcherkar

(1) Only a and b
(2) Only b and c
(3) Only a, b and d
(4) Only a, c and d

8. होमरूल म्हणजे

अ. आपल्या देशाचा कारभार प्राप्त करून घेणे

ब. स्वराज्य प्राप्त करून घेणे

क. इंग्रजांच्या जोखंडातून मुक्त होणे

ड. स्वशासनास प्रतिकार करणे

(1) फक्त अ आणि क
(2) फक्त ब
(3) अ, ब आणि क
(4) फक्त ब आणि क

Homerule means

A. To acquire the right to govern our country

B. Achieving self governance

C. For the yoke of the British to break

D. Resisting self-Government

(1) Only A and C
(2) Only B
(3) A, B and C
(4) Only B and C

9. सतीप्रथेबद्दल 'शास्त्राच्या संमतीने केलेला खून', असे खालीलपैकी कोणी म्हटले आहे ?

(1) लॉर्ड बेंटींक
(2) महात्मा फुले
(3) राजा राममोहन रॉय
(4) ईश्वरचंद्र विद्यासागर

Who among the following said that Sati is, 'Murder with the consent of the scriptures' ?

(1) Lord Bentinck
(2) Mahatma Phule
(3) Raja Rammohan Roy
(4) Ishwarchandra Vidyasagar

10. पुढील जोड्या लावा :

अ. प्रार्थना समाज — I. १८७०
ब. सत्यशोधक समाज — II. १८७५
क. सार्वजनिक सभा — III. १८६७
ड. आर्य समाज — IV. १८७३

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | II | I | IV |
| (2) | IV | II | I | III |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | I | II | III | IV |

Match the following pairs :

a. Prarthana Samaj — I. 1870
b. Satyashodhak Samaj — II. 1875
c. Sarvjanik Sabha — III. 1867
d. Arya Samaj — IV. 1873

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | II | I | IV |
| (2) | IV | II | I | III |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | I | II | III | IV |

11. कोणत्या दोन नद्या दरम्यानच्या प्रदेशाला पंजाब हिमालय म्हणतात ?

(1) सिंधु – सतलज
(2) सतलज – गंगा
(3) चिनाब – यमुना
(4) काली – तिस्ता

The region between which two rivers is called the Punjab Himalayas ?

(1) Indus – Sutlaj
(2) Sutlaj – Ganga
(3) Chenab – Yamuna
(4) Kali – Tista

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

B

12. पश्चिम आणि वायव्य भारतामधे अति उष्ण, कोरडे व धुळीचे वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांना ________ म्हणतात.

(1) नॉर्वेस्टर
(2) लू वारे
(3) कालबैसाखी
(4) चहा वारे

Very hot and dry dusty winds, which blow very strongly in the Western and North-Western parts of India is called as ________.

(1) Norvester
(2) Loo winds
(3) Kalbaisakhi
(4) Tea winds

13. महाराष्ट्रातील घाट व त्यावरील रस्ते यांच्या योग्य जोड्या लावा.

| घाट | रस्ते |
|---|---|
| अ. फोंडा | I. मुंबई – नाशिक |
| ब. माळशेज | II. कोल्हापुर – कुडाळ |
| क. हनुमंते | III. ठाणे – अहमदनगर |
| ड. थळ | IV. कोल्हापुर – पणजी |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | IV | I |
| (2) | IV | I | III | II |
| (3) | III | I | IV | II |
| (4) | IV | III | II | I |

Match the pairs of Ghats and Roads in Maharashtra.

| Ghat | Road |
|---|---|
| A. Phonda | I. Mumbai – Nashik |
| B. Malshej | II. Kolhapur – Kudal |
| C. Hanumante | III. Thane – Ahmadnagar |
| D. Thal | IV. Kolhapur – Panaji |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | IV | I |
| (2) | IV | I | III | II |
| (3) | III | I | IV | II |
| (4) | IV | III | II | I |

**14.** शंभू महादेवाचे डोंगर रांग ________ नद्यांच्या दरम्यान आहेत.

(1) तापी – गोदावरी
(2) गोदावरी – भिमा
(3) भिमा – कृष्णा
(4) कोयना – कृष्णा

The mountain range of Shambhu Mahadev lies between ________ rivers.

(1) Tapi – Godavari
(2) Godavari – Bhima
(3) Bhima – Krishna
(4) Koyna – Krishna

**15.** स्वामीनाथन (१९७०) यांच्या व्याख्येनुसार भारतातील कोरडवाहू शेती म्हणजे ज्या ठिकाणी सरासरी वार्षिक पर्जन्य हे

अ. १०० सेमी पेक्षा जास्त पण १२० सेमी पेक्षा कमी
ब. ३० सेमी पेक्षा कमी
क. २०० सेमी पेक्षा जास्त
ड. १०० सेमी पेक्षा कमी पण ४० सेमी पेक्षा जास्त

(1) फक्त अ
(2) अ आणि ब
(3) फक्त क
(4) फक्त ड

Dry farming in India as defined by Swaminathan (1970) is, where mean annual rainfall is

a. More than 100 cm but less than 120 cm
b. Less than 30 cm
c. More than 200 cm
d. Less than 100 cm but more than 40 cm

(1) only a
(2) a and b
(3) only c
(4) only d

**16.** भारतीय जनगणनेनुसार खालीलपैकी कोणती वस्ती नागरी वस्ती म्हणून ओळखली जाते ?

अ. महानगरपालिका/नगरपालिका असणे.
ब. ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या आहे.
क. ५०% लोक बिगर शेती व्यवसाय करणारे.
ड. लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. ला ४०० पेक्षा जास्त.

(1) अ, ब आणि क
(2) ब, क आणि ड
(3) अ, ब आणि ड
(4) वरील सर्व

According to Indian census, which of the following settlements are known as urban settlements ?

a. There is a Municipal Corporation/Municipality.
b. Population is more than 5000.
c. 50% of the people are engaged in non-agricultural occupations.
d. The population density is more than 400 per square km.

(1) a, b and c
(2) b, c and d
(3) a, b and d
(4) All of the above

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

17. महाराष्ट्रातील १९६० आणि २०२० मधील एकूण प्रशासकिय विभाग अनुक्रमे ______ व ______ आहेत.

(1) ४ आणि ८
(2) ४ आणि ६
(3) ५ आणि ७
(4) ५ आणि ८

Total administrative divisions in Maharashtra, during 1960 and 2020 are ______ and ______ respectively.

(1) 4 and 8
(2) 4 and 6
(3) 5 and 7
(4) 5 and 8

18. योग्य जोड्या जुळवा :

| मृदा प्रकार | प्रदेश |
|---|---|
| अ. काळी कापसाची मृदा | i. कोंकण प्रदेश |
| ब. जांभी मृदा | ii. पूर्व विदर्भ |
| क. तांबडी मृदा | iii. महाराष्ट्र पठारी प्रदेश |
| ड. भरड उथळ मृदा | iv. सह्याद्रीचा पूर्व भाग |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | ii | iv | i |
| (2) | iii | i | ii | iv |
| (3) | ii | iv | i | iii |
| (4) | i | ii | iv | iii |

Match the following :

| Type of soil | Region |
|---|---|
| a. Black cotton soil | i. Konkan region |
| b. Lateritic soil | ii. Eastern vidharba |
| c. Reddish brown soil | iii. Maharashtra's plateau region |
| d. Coarse shallow soil | iv. Eastern side of Sahyadri |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | ii | iv | i |
| (2) | iii | i | ii | iv |
| (3) | ii | iv | i | iii |
| (4) | i | ii | iv | iii |

19. खालील विधानांचे निरीक्षण करून योग्य पर्याय निवडा.
अ. अग्निजन्य खडकात – लोह, सोने, तांबे आढळते.
ब. स्तरित खडकात चुनखडक आणि जिप्सम सारखी खनिजे आढळतात.
क. रूपांतरित खडकात अभ्रक, गार्नेट सारखी खनिजे आढळत नाहीत.
(1) अ आणि क बरोबर आहेत
(2) अ, ब आणि क बरोबर आहेत
(3) अ आणि ब बरोबर आहेत
(4) फक्त ब बरोबर आहे

Observe the following statements and select the correct option.
a. Iron, gold and copper are found in igneous rocks.
b. Minerals such as limestone and gypsum are found in sedimentary rocks.
c. Minerals such as mica, garnet are not found in metamorphic rocks.
(1) a and c are correct
(2) a, b and c are correct
(3) a and b are correct
(4) only b is correct

20. खालीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त ?
अ. महाराष्ट्रात भिमा नदीचे स्वतंत्र खोरे आहे.
ब. पैनगंगा नदी अजिंठा रांगेत उगम पावते.
क. मांजरा नदी ही कृष्णेची उपनदी आहे.
ड. सिंदफना नदी ही गोदावरीची उत्तरेकडील उपनदी आहे.
(1) फक्त अ आणि ब (2) फक्त ब (3) क आणि ड (4) अ, ब आणि क

Which of the following statement/s is/are correct ?
a. Bhima river basin is a separate river basin in Maharashtra.
b. Painganga river rises in Ajanta range.
c. River Manjara is the tributary of Krishna.
d. Sindphana river is a northern tributary of Godawari.
(1) only a and b (2) only b (3) c and d (4) a, b and c

21. भारतीय रहिवाशांसाठी खालीलपैकी कोणते परवानगी असलेले विदेशी चलन व्यवहार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पार पाडण्यासाठीचे अधिकृत व्यासपीठ नाही ?
(1) एक मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंज
(2) भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) द्वारे अधिकृत व्यासपीठ
(3) फॉरेक्स ट्रेडिंग सेवा देणारे कोणतेही ऑनलाइन व्यासपीठ
(4) परकीय चलनात व्यवहार करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकने प्राधिकृत केलेली बँक

Which of the following is not an authorised platform for residents in India to execute permitted forex transactions electronically ?
(1) A recognised stock exchange
(2) A platform authorised by the Reserve Bank of India (RBI)
(3) Any online platform offering forex trading services
(4) A bank authorised by the RBI to deal in foreign exchange

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

22. भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संस्थेचे मुख्य उद्दिष्ट कोणते आहे ?

अ. कर्ज वाटप करणे.

ब. ग्रामीण औद्योगीकरणाला चालना देणे.

क. कृषी मालाचे सहकारीतत्वांवर विपणन करण्यास प्रोत्साहन देणे.

ड. स्वस्त दरात कृषी उत्पादन विकणे.

(1) फक्त ब (2) अ आणि ड

(3) फक्त क (4) ब आणि क

Which is the main objective of National Agricultural Cooperative Marketing Federation of India (NAFED) ?

a. Credit distribution.

b. To promote rural industrialization.

c. To promote cooperative marketing of agricultural produce.

d. To sell agricultural produce in cheaper cost.

(1) Only b (2) a and d

(3) Only c (4) b and c

23. भारतीय अर्थसंकल्पासंदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

अ. भारतीय अर्थसंकल्पाचा दस्तावेज एकूण जमा खर्च दर्शविते.

ब. भारतीय अर्थसंकल्पाचा दस्तावेज राजकोषीय तूट दर्शविते.

क. भारतीय अर्थसंकल्पाचा दस्तावेज प्राथमिक तूट दर्शविते.

ड. भारतीय अर्थसंकल्पाचा दस्तावेज परिणामकारक महसूली तूट दर्शविते.

(1) अ आणि ब (2) क आणि ड

(3) फक्त ब (4) वरील सर्व

Which of the following statement is correct regarding Indian Budget ?

a. Indian budgetary documents shows total receipts and expenditure.

b. Indian budgetary documents shows fiscal deficit.

c. Indian budgetary documents shows primary deficit.

d. Indian budgetary documents shows effective revenue deficit.

(1) a and b (2) c and d

(3) Only b (4) All of the above

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**24.** खालीलपैकी कोणते विधान औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकाबद्दल खरे आहे ?

अ. हे भारतातील सर्व कामगारांना लागू होते, मग त्यांचे कार्यक्षेत्र कोणतेही असो.

ब. केवळ किमान वेतन निश्चित करण्यासाठी हे वापरले जाते.

क. हे वस्तु आणि सेवांच्या एका निश्चित बास्केटवर आधारित आहे जे कधीही बदलत नाही.

ड. औद्योगिक कामगारांना वाजवी वेतन मिळून त्यांचे जीवनमान चांगले राखण्यास हे मदत करते.

(1) फक्त अ (2) फक्त क (3) फक्त ड (4) अ आणि ब दोन्ही

Which of the following statements is true about the Consumer Price Index for Industrial Workers (CPI-IW) ?

a. It applies to all workers in India, regardless of their sector.

b. It is solely used to determine the minimum wage.

c. It is based on fixed basket of goods and services which never changes.

d. It helps to ensure that industrial workers receive fair wages and maintain a decent standard of living.

(1) Only a (2) Only c (3) Only d (4) Both a and b

---

**25.** खालीलपैकी कोणते मध्यवर्ती बँकेच्या गुणात्मक पत-नियंत्रणाचे साधन नाही ?

(1) उपभोग कर्जाचे नियंत्रण (2) आदेशांच्या मार्फत नियंत्रण

(3) कर्ज तारण सीमांचे नियमन (4) खुल्या बाजारातील व्यवहार

Which of the following is not an method of qualitative credit control of Central Bank ?

(1) Control on consumer credit (2) Control through issuing directives

(3) Regulation of margin requirements (4) Open market operations

---

**26.** खालील विधानांपैकी कोणते बरोबर आहे ?

अ. भारतीय हस्तोद्योग विकास महामंडळाची स्थापना 1958 साली करण्यात आली.

ब. 'पीएम विश्वकर्मा कौशल सन्मान' योजना ही केंद्रशासन पुरस्कृत योजना आहे.

(1) अ बरोबर आहे (2) ब बरोबर आहे

(3) अ आणि ब बरोबर आहेत (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Which of the following statements are correct ?

a. Indian Handicrafts Development Corporation was established in the year 1958.

b. 'PM Vishwakarma Kaushal Samman' Scheme is Central Government sponsored scheme.

(1) a is correct (2) b is correct

(3) a and b are correct (4) None of the above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**27.** जोड्या जुळवा :

| क्रांती | | उत्पादन | |
|---|---|---|---|
| अ. | हरित क्रांती | i. | तेलबिया उत्पादन |
| ब. | सोनेरी क्रांती | ii. | मत्स्य उत्पादन |
| क. | निळी क्रांती | iii. | अन्नधान्य उत्पादन |
| ड. | पिवळी क्रांती | iv. | फळांचे उत्पादन |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | ii | i |
| (2) | i | ii | iv | iii |
| (3) | iii | iv | ii | i |
| (4) | ii | i | iv | iii |

Match the following :

| **Revolution** | | **Production** | |
|---|---|---|---|
| a. | Green Revolution | i. | Oil-seed Production |
| b. | Golden Revolution | ii. | Fishery Production |
| c. | Blue Revolution | iii. | Food Production |
| d. | Yellow Revolution | iv. | Fruit Production |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | ii | i |
| (2) | i | ii | iv | iii |
| (3) | iii | iv | ii | i |
| (4) | ii | i | iv | iii |

**28.** भारतीय संविधानातील अनुच्छेद ________ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पाची परिभाषा केली आहे.

(1) अनुच्छेद ११२ (2) अनुच्छेद ११३

(3) अनुच्छेद ११६ (4) अनुच्छेद १२०

The Constitution of India defines the Union Budget under the Article

(1) Article 112 (2) Article 113

(3) Article 116 (4) Article 120

**29.** खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

अ. स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये नागरिकानी देशाबाहेर कमावलेले उत्पन्न समाविष्ट नसते.

ब. स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये नागरिकानी देशाबाहेर कमावलेले उत्पन्न समाविष्ट असते.

(1) फक्त अ

(2) फक्त ब

(3) अ आणि ब दोन्हीं

(4) यापैकी एकही नाही

Which of the following statement is true ?

a. Gross domestic product does not include the income earned by the nationals outside the country.

b. Gross domestic product does include the income earned by the nationals outside the country.

(1) Only a

(2) Only b

(3) Both a and b

(4) None of these

---

**30.** __________ मध्ये मानवी गरीबी निर्देशांकाच्या जागी बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाची संकल्पना मांडण्यात आली.

(1) मानव विकास अहवाल १९९७

(2) नियोजन आयोगाचा अहवाल २०१२

(3) मानव विकास अहवाल २०१०

(4) सुरेश तेंडुलकर समितीचा अहवाल २००९

__________ introduced the concept of multidimensional poverty index to replace human poverty index.

(1) Human Development Report 1997

(2) Planning Commission Report 2012

(3) Human Development Report 2010

(4) Suresh Tendulkar Committee Report 2009

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

31. खालील विधाने विचारात घ्या :

अ. स्थूल राष्ट्रीय उत्पादनापेक्षा निव्वळ राष्ट्रीय उत्पादन नेहमीच कमी असते.

ब. स्थूल राष्ट्रीय उत्पादनात घसाऱ्याचा समावेश असतो, तर निव्वळ राष्ट्रीय उत्पादनात घसाऱ्याचा समावेश नसतो.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/त ?

(1) फक्त अ बरोबर आहे
(2) फक्त ब बरोबर आहे
(3) अ आणि ब बरोबर आहेत
(4) अ आणि ब चूक आहेत

Consider the following statements :

a. Net National Product is always less than Gross National Product.

b. Gross National Product includes depreciation while Net National Product does not include depreciation.

Which of the statement/s given above is/are correct ?

(1) Only a is correct
(2) Only b is correct
(3) a and b are correct
(4) a and b are incorrect

32. भारताच्या 2023 – 24 च्या अर्थसंकल्पाबाबत खालीलपैकी कोणती विधान/ने बरोबर आहे/त ?

अ. भरडधान्यास 'श्री अन्न' या नावाने सन्मानित करण्यात आले आहे.

ब. 'किसान क्रेडिट कार्ड' सुविधा वाढविण्यासाठी रुपये 23,000 कोटी तरतूद करण्यात आली आहे.

क. 'राष्ट्रीय पशुधन मिशन' करिता रुपये 1,000 कोटी तरतूद करण्यात आली.

(1) केवळ अ
(2) केवळ अ आणि ब
(3) केवळ ब आणि क
(4) वरीलपैकी सर्व

Which of the following statement/s is/are correct about India's Budget 2023 – 24 ?

a. Millets have been addressed with the name 'Shree Anna'.

b. Rs. 23,000 crore has been provided for enchancing 'Kisan Credit Card' facilities.

c. 'National Live-stock Mission' has been allocated Rs. 1,000 crore.

(1) Only a
(2) Only a and b
(3) Only b and c
(4) All of the above

**33.** भारतीय लोकसंख्येच्या अभ्यासात खालीलपैकी सतत बदलणारे तीन प्रमुख घटक कोणते आहेत ?

(1) जन्म दर, माता मृत्यु दर आणि स्थलांतर

(2) जन्म दर, मृत्यु दर आणि अर्भक मृत्यु दर

(3) जन्म दर, मृत्यु दर आणि स्थलांतर

(4) जन्म दर, माता मृत्यु दर आणि अर्भक मृत्यु दर

Which of the following are three important factors leading to change in the demographic study of India ?

(1) Birth rate, maternal mortality rate and migration

(2) Birth rate, death rate and infant mortality rate

(3) Birth rate, death rate and migration

(4) Birth rate, maternal mortality rate and infant mortality rate

---

**34.** आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या २०२४ मध्ये नमूद केलेल्या माहितीनुसार जगातील सर्वोच्च पाच सर्वात मोठ्या अर्थव्यवस्था/सर्वात श्रीमंत देशांचा योग्य क्रम लावा.

(1) चीन, अमेरिका, जर्मनी, भारत आणि जपान

(2) अमेरिका, भारत, चीन, जपान आणि जर्मनी

(3) जर्मनी, अमेरिका, भारत, चीन आणि जपान

(4) अमेरिका, चीन, जर्मनी, जपान आणि भारत

State the correct order of the top five largest economies/richest countries in the world as per the International Monetary Fund (IMF) data published in 2024.

(1) China, USA, Germany, India and Japan

(2) USA, India, China, Japan and Germany

(3) Germany, USA, India, China and Japan

(4) USA, China, Germany, Japan and India

---

**35.** डॉ. विजय केळकर समितीचा अहवाल हा __________ शी संबंधित आहे.

(1) प्रशासकीय सुधारणा (2) अप्रत्यक्ष कर विषयक सुधारणा

(3) व्यापार विषयक सुधारणा (4) वित्तीय क्षेत्रातील सुधारणा

Dr. Vijay Kelkar Committee Report is related to __________.

(1) Administrative reforms (2) Indirect tax reforms

(3) Trade reforms (4) Financial sector reforms

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**36.** बी. एन. गोस्वामी हे खालीलपैकी कोणत्या क्षेत्राशी संबंधित होते ?

(1) कला इतिहास
(2) प्राचीन भारतीय इतिहास
(3) जागतिक इतिहास
(4) साहित्य

B. N. Goswamy was associated to which of the following field ?

(1) Art History
(2) Ancient Indian History
(3) World History
(4) Literature

---

**37.** लक्षद्वीप संबंधी पुढील विधानांपैकी अयोग्य विधान कोणते ?

अ. लक्षद्वीप म्हणजे मलयालम् आणि संस्कृत भाषांमध्ये 'लाख द्विप' होय.
ब. आकारमानानुसार हा भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात छोटा केंद्रशासित प्रदेश आहे.
क. या केंद्रशासित प्रदेशाचे मुख्य शहर कवरत्ती हे आहे.
ड. अगाट्टी ही लक्षद्वीपची राजधानी आहे.

(1) अ, ब, क, ड
(2) फक्त अ, ब, ड
(3) फक्त अ, ड
(4) फक्त ब, ड

Which of the following statements are incorrect about Lakshadweep ?

a. The name Lakshadweep in Malayalam and Sanskrit means 'a hundred thousand islands'.
b. It is India's second smallest Union Territory by area.
c. Kavaratti is the principal town of this Union Territory.
d. Agatti is capital of Lakshadweep.

(1) a, b, c, d
(2) Only a, b, d
(3) Only a, d
(4) Only b, d

---

**38.** केंद्र सरकारच्या कोणत्या मंत्रालयाद्वारे "संघटन से समृद्धी" हे अभियान चालविले जाते ?

(1) गृह मंत्रालय
(2) वित्त मंत्रालय
(3) ग्रामीण विकास मंत्रालय
(4) व्यापार मंत्रालय

Which Ministry of Union Government conducts the Campaign of "Sangathan se Samriddhi" ?

(1) Ministry of Home Affairs
(2) Ministry of Finance
(3) Ministry of Rural Development
(4) Ministry of Trade

**39.** खालीलपैकी कोणत्या अंतराळ संशोधन संस्थांनी भूगर्भातील पाण्याचे सर्वेक्षण करण्यासाठी संयुक्तपणे SWOT नावाची आंतरराष्ट्रीय उपग्रह मोहीम सुरू केली आहे ?

(1) नासा आणि सी.एन.ई.एस.
(2) नासा आणि इस्रो
(3) नासा आणि ई.एस.ए.
(4) नासा आणि जाक्सा

Which of the following space research agencies have jointly launched 'International Satellite Mission' SWOT to survey Earth water ?

(1) NASA and CNES
(2) NASA and ISRO
(3) NASA and ESA
(4) NASA and JAXA

---

**40.** अन्न कचरा निर्देशांक अहवाल 2024 __________ यांनी प्रस्तुत केला आहे.

(1) संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण कार्यक्रम
(2) अन्न आणि कृषी संघटना
(3) संयुक्त राष्ट्रसंघ कृषी कार्यक्रम
(4) हवामान बदलाच्या समस्येवरील आंतरसरकारी परिषद

Food Waste Index (FWI) Report 2024 is released by __________.

(1) United Nations Environment Programme
(2) Food and Agriculture Organisation
(3) United Nations Agricultural Programme
(4) Intergovernmental Panel on Climate Change

---

**41.** ''द इंडियन नेव्ही @75 रेमिनिसिंग द व्हायेज'' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?

(1) शोभा डे
(2) कमोडोर दिलीप दोंदे
(3) कमोडोर रणजीत राय
(4) कमोडोर के. एस. सुब्रमनियम

Who is the author of the book "The Indian Navy @75 reminiscing the voyage" ?

(1) Shobha De
(2) Commodore Dilip Donde
(3) Commodore Ranjit Rai
(4) Commodore K. S. Subramaniam

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

42. पुढीलपैकी कोणी 'पुंज (क्वांटम) कण' ह्या शब्दाची निर्मिती केली आहे ?
(1) एकिमोव्ह आणि ओनुश्चेंको
(2) मार्क रीड
(3) एल. ई. ब्रुस
(4) एफ्रोस

Who among the following coined the term 'quantum dots' ?
(1) Ekimov and Onuschenko
(2) Mark Reed
(3) L. E. Brus
(4) Efros

43. अफ्रिकन युनियनचे गीत (anthem) कोणते आहे ?
(1) गॉड ब्लेस अफ्रिका
(2) ब्लेसड् बी द लँड ऑफ अफ्रिका
(3) लेट अस ऑल युनायट अँड सेलिब्रेट टुगेदर
(4) ओड टू जॉय

Which of the following is anthem of African Union (AU) ?
(1) God bless Africa
(2) Blessed be the Land of Africa
(3) Let us all unite and celebrate together
(4) Ode to joy

44. मालदिवविषयी खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?
अ. मालदिव मधील लोकसंख्या बहुतांशी मालदिवीय वंश गटाची आहेत.
ब. इस्लाम हा राज्याचा अधिकृत धर्म आहे.
क. अधिकृत भाषा अरेबिक आहे.
ड. राष्ट्रपती हे राज्य आणि शासन प्रमुख असतात.
(1) अ, ब, क, ड (2) फक्त अ, ब (3) फक्त अ, ब, ड (4) फक्त ब, क, ड

Which of the following statements are correct about the Maldives ?
a. The population of Maldives belongs almost entirely to the Maldivian ethnic group.
b. Islam is official religion of the State.
c. The official language is Arabic.
d. The head of State and Government is the President.
(1) a, b, c, d (2) Only a, b (3) Only a, b, d (4) Only b, c, d

च्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

45. पुढीलपैकी कोणती/कोणत्या साहित्यकृती जॉन फॉसे यांच्या आहेत ?

अ. बोट हाऊस
ब. मेलानकोली I
क. रौइट, स्वार्ट् (रेड, ब्लैक)

(1) अ, ब, क (2) फक्त अ, ब (3) फक्त अ (4) फक्त अ, क

Which of the following is/are works by Jon Fosse ?

a. Boat house
b. Melancholy I
c. Raudt, Svart (Red, Black)

(1) a, b, c (2) Only a, b (3) Only a (4) Only a, c

46. भारतातील शहरांचे 3D नकाशे तयार करण्यासाठी सर्वे ऑफ इंडियाने कोणत्या कंपनी सोबत करार केला आहे ?

(1) नेक्सॉन (2) इन्फोसिस
(3) जेनिसिस इंटरनॅशनल (4) फ्रीडम जी.पी.एस.

With which company did Survey of India sign an agreement to prepare 3D maps of cities in India ?

(1) Nexon (2) Infosys
(3) Genesys International (4) Freedom GPS

47. पुढीलपैकी कोणत्या जोड्यांमध्ये शहरांची नावे आणि तेथील क्रिकेट क्रीडांगणांची नावे योग्य जोडलेली आहेत ?

अ. ग्रीन पार्क स्टेडियम – कानपूर
ब. होळकर स्टेडियम – इंदोर
क. एम. ए. चिदंबरम स्टेडियम – चेन्नई
ड. एम. चिन्नस्वामी स्टेडियम – बेंगलोर

